MHSN05000335-2017

**नियमित दिवाणी दावा क्र. १०८/२०१७**
**मधील निशाणी ७६ खालील आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे दाखल केला असून याद्वारे विनंती केली आहे की, या कामातील वादी नं.३ हे दिनांक ११.०१.२०२६ रोजी मयत झाले असून त्यांना वादी नं.२ हे सरळ व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांचे वारस पुन्हा अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. परंतु, तांत्रिक दृष्ट्या नि.१ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वादी क्र.३ यांच्या नावासमोर मयत वारस नं.२ असा शेरा नमुद करणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी असावी.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले आहे की, वादी क्र.३ यांचा मयत दाखला हजर करणे आवश्यक आहे. त्यानंतर वादी यांना पुर्तता करता येणार आहे. प्रतिवादी यांनी तोंडी युक्तिवाद केला की, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. सदर अर्जासोबत वादी क्र.३ मयत झाले असल्याबाबत कोणताही मृत्युदाखला हजर केलेला नाही.

३. अभिलेखावरील दस्तऐवजांची अवलोकन केले. सदर प्रकरणात नि.७८ च्या दस्तऐवज यादीसोबत वादीने वादी क्र.३ गजानन अजित शेटे यांचा मृत्यु दाखला दाखल केला आहे. सदर दाखल्या प्रमाणे असे दिसून येते की, वादी क्र.३ यांचा मृत्यु दिनांक ११.०१.२०२६ रोजी झाला आहे. सदर दाव्यात अद्याप पुरावा पूर्ण झालेला नाही. अर्जात नमुद केल्या प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यास प्रतिवादींचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. परंतु, सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे नुकसान होऊ शकते. सदर दुरुस्ती दाव्यामध्ये केल्याने खरी वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होणार आहे. तसेच, दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. तसेच, गुणवत्तेवर प्रकरण निकाली काढण्याकरीता मदत

होणार आहे. तसेच, वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होणार आहे. करिता, खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद केल्या प्रमाणे वादी यांनी दाव्यात दुरुस्ती सदर आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित).

MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2026.06.18 16:45:28 +0530

ठिकाण – इस्लामपूर. (मृण्मयी मु. चौधरी)

दिनांक – १८.०६.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर

| - : C E R T I F I C A T E : - | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order. | | |
| Name of Stenographer | :- | Satish N. Pethkar, |
| Court Name | :- | Mrunmayee M. Choudhary.<br>Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 18.06.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 18.06.2026 |
| Order uploaded on | :- | 18.06.2026 |